सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

PUBLIC WORKS DEPARTMENT PWD MAHARASHTRA

# नागरिकांची सनद -२०२५

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम -२००५ मधील कलम ८(१)(२) नुसार

## कार्यकारी अभियंता

## सार्वजनिक बांधकाम विभाग

## सावंतवाडी

# कार्यकारी अभियंता
# सार्वजनिक बांधकाम विभाग सावंतवाडी
# कार्यालयाची

## “ नागरिकांची सनद -२०२५”

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ |
| २. | विभागीय कार्यालयाची रचना | २ |
| ३. | विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र | ३ |
| ४. | विभागीय कार्यालयाची बांधिलकी | ४ |
| ५. | शासकीय विश्रामगृहाचे आरक्षण | ७ |
| ६. | विभागीय कार्यालयांतर्गत कार्यपूतीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता | ९ |
| ७. | विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता | १० |
| ८. | नागरिकांच्या सनदेचा तसेच जनसमान्यांकडून प्राप्त सूचनांचा आढावा / सिंहावलोकन | ११ |
| ९. | नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी | १२ |
| १०. | नागरीकांची जबाबदारी | १३ |
| ११. | परिशिष्ट - अ  मुख्यालय दर्शविणारा वृक्षतक्ता | १४ |
| १२. | परिशिष्ट - ब   कार्यक्षेत्र दर्शविणारा वृक्षतक्ता | १५ |
| १३. | परिशिष्ट - क (१ )कार्यक्षेत्रातील रस्त्यांचा दर्जा व उपविभाग निहाय रस्त्यांची लांबी | १७ |
| १४. | परिशिष्ट - क (२ )कार्यक्षेत्रातील उपविभाग निहाय पूलांची सूची | १७ |
| १५. | परिशिष्ट - क (३ )कार्यक्षेत्रातील उपविभाग निहाय शासकीय इमारतींची सूची | १८ |
| १६. | परिशिष्ट – ड कार्यपूर्तीचे वेळापत्रक | १९ |
| १७. | परिशिष्ट – इ  लोकसेवा हक्क अधिनियम , २०१५ | २३ |

# १. प्रस्तावना

"सह्याद्रीच्या तळी शोभते हिरवे तळ कोकण, राष्ट्रदेवीचे निसर्गनिर्मित केवळ नंदनवन." या कवी माधव यांच्या ओळी साक्षात जगणारा जिल्हा म्हणजेच सिंधुदुर्ग जिल्हा. एका बाजूला कोंकण प्रदेशातील अरबी समुद्रातील स्वच्छ व सुंदर समुद्रकिनारे आणि दुसरीकडे सह्याद्री पर्वताच्या डोंगररांगा, सिंधुदूर्ग व विजयदूर्ग असे ऐतिहासिक किल्ले आहेत. या जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या अत्यंत गौरवशाली परंपरा असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत सन १९७८ पासून कार्यरत असलेले , कोकणाचे नाते मुंबई या आर्थिक नगरीशी जोडून कोकणातील नागरिकांच्या विकासाला गती देणारे **सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी, जिल्हा सिंधुदुर्ग** हे महत्वाचे कार्यालय आहे. सार्वजनिक बांधकाम विभागीय कार्यालय हे "निर्माण भवन", खासकिलवाडा, मोतीतलावासमोर, सावंतवाडी येथे कार्यरत असून कोकणातल्या नागरिकांशी बांधिलकी जपण्यास कटीबध्द आहे. ही बांधिलकी सार्वजनिक बांधकाम विभाग या सनदेद्वारे जाहिर करत असून ती स्विकारीत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारीत केलेल्या व पथदर्शीत केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणूकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभुतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन तसेच सर्वसामान्य नागरिकांचे सार्वजनिक बांधकाम विभागा विषयीचे हक्क त्यांच्या पर्यन्त प्रगतीच्या व विकासाच्या वाटेने अतिशय सुलभतेने पोहचविण्याचा हा ध्यास आहे.

सही \-

***कार्यकारी अभियंता***

***सार्वजनिक बांधकाम विभाग***

***सावंतवाडी***

# २.  विभागीय कार्यालयाची रचना

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रादेशिक स्तरावरील मुख्य अभियंता हे सर्वोच्च तांत्रिक अधिकारी असून त्यांचे मुख्यालय मुंबई या ठिकाणी आहे. प्रादेशिक विभागाअंतर्गत कामांची अंमलबजावणी व प्रशासनिक नियंत्रण मुख्य अभियंता स्तरावर होते. प्रादेशिक विभागाच्या मुख्य अभियंत्यांचे अखत्यारीत जिल्हा स्तरावर सर्वसाधारणपणे अधीक्षक अभियंता दर्जाचे अधिकारी मंडळांतर्गत कामांची अंमलबजावणी व प्रशासनिक नियंत्रण यांची जबाबदारी सांभाळतात.

सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, कोकण अंतर्गत अधीक्षक अभियंता, सिंधुदुर्ग, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सिंधुदुर्ग अंतर्गत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी हे कार्यालय असून त्यांचे कार्यक्षेत्र सिंधुदुर्ग जिल्हयातील ०५ तालुक्यामध्ये आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी यांचे अधिपत्याखाली एकूण ०५ उप विभागीय अभियंता कार्यरत असून सर्वसाधारणपणे उपअभियंत्यांकडे तालुक्याचे कार्यक्षेत्र आहे. या तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या बाबतीत कार्यक्षेत्राचा निकष रस्त्याच्या लांबीनुसार असून ते केंद्र शासनाचे रस्ते भूतल व परिवहन मंत्रालया अंतर्गत कार्यकारी अभियंता , राष्ट्रीय विभाग रत्नागिरी , उपविभाग सावंतवाडी कडे आहे. राज्यक्षेत्र व स्थानिक क्षेत्र (जिल्हा परिषद) यांचेकडील कामांसाठी स्वतंत्र कार्यकारी अभियंता व उप अभियंता आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी कार्यालयाचे रचना दर्शविणारा वृक्षतक्ता सोबत जोडला आहे. **(परिशिष्ट-अ)**

कार्यकारी अभियंता हे विभागांतर्गत प्रत्येक तांत्रिक बाबीसाठी जबाबदार असे अधिकारी आहेत. प्रस्तावनेत नमूद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. विभागांतर्गत कामांच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र सा.बां. नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रीय अधिकाऱ्याकडून केले जाते.

# ३. विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र

सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयाचे कार्यक्षेत्र सिंधुदुर्ग जिल्हयात असून ते जिल्हयातील एकूण ०५ तालुक्यात विखुरलेले आहे. सिंधुदुर्ग जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र एकूण ५२३२ चौ. कि.मी. असून १२१ कि.मी. सागरी किनारपट्टी आहे. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागाचा कार्यक्षेत्र ४६- रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघ आणि २६९ कुडाळ- मालवण व २७० सावंतवाडी या दोन विधानसभा मतदारसंघाशी संबंधित येते. विभागांतर्गत कार्यक्षेत्राशी दोन विधानपरिषदेचे सदस्य निगडीत आहेत. लोकसभा/ विधानसभा/ विधानपरिषद सदस्य यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाशी निगडीत असलेली मतदारसंघातील कामे प्राधान्याने आवश्यकतेनुसार व निधीशी अधीन राहून हाती घेण्यात येतात.

विभागीय कार्यालयाकडे एकूण ०५ तालुक्यांचे कार्यक्षेत्र आहे. त्याप्रमाणे सावंतवाडी सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी यांचेकडे सिंधुदुर्ग जिल्हयातील **मालवण, वेंगुर्ला, कुडाळ, दोडामार्ग, सावंतवाडी** या तालुक्यांचा समावेश आहे. विभागांतर्गत कार्यक्षेत्राची विभागणी उप विभागीय अभियंता यांचे अधिकार क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम उप विभागामध्ये झालेली असून त्यांची मुख्यालये त्या त्या तालुक्यामध्ये आहेत.

विभाग/ उपविभाग कार्यालयाची सूची व मुख्यालये- परिशिष्ट "ब" तसेच विभागीय कार्यालयांतर्गत प्रमुख राज्यमार्ग, राज्य महामार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग यांची दर्जेनिहाय लांबी, सदर रस्त्यांवर येणारे लहान व मोठे पूल यांची सूची तसेच देखभाल व दुरुस्तीसाठी असलेल्या शासकीय इमारतींचे क्षेत्रफळ दर्शविणारी उपविभाग निहाय सूची परिशिष्ट "क" प्रमाणे सोबत जोडण्यात येत आहे.

# ४. विभागीय कार्यालयाची बांधिलकी

१. सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रांतर्गत परिरक्षण दुरुस्ती अंतर्गत देखभाली साठी असलेल्या शासकीय कार्यालयीन इमारती व निवासी इमारती तसेच रस्ते व पुलांची नियतकालीक देखभाल व दुरुस्ती शासनामार्फत उपलब्ध होणाऱ्या निधीच्या उपलब्धतेनुसार प्रभावीपणे पूर्ण करणे व सेवा, सुविधांचा स्तर उंचावणे.

२. रस्ते विकास योजना आराखड्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांची नवीन बांधकामे, सुधारणा तसेच त्यावरील मोठे पूल, लहान पूल, रस्ते, इमारती, मोऱ्या यांची कामे विहित निकषास अनुसरुन गुणवत्तापूर्ण करणे.

३. आपल्या भारत देशाची धमणी समजले जाणारे सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयाचे कार्यक्षेत्रात येणारे राज्य क्षेत्राकडील प्रमुख राज्य मार्ग, राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग तसेच स्थानिक क्षेत्राकडील जिल्हा मार्ग, तालुका ग्रामिण मार्ग विहीत कालावधीत गुणवत्तापूर्ण दर्जाचे करणे.

४. सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयाचे अधिपत्त्यातील क्षेत्रीय कार्यालयांद्वारे योग्य माध्यमातून अन्य कॉर्पोरेट संस्थांना रस्त्यांच्या कडेने विविध सेवा वाहिन्या शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार टाकण्याच्या प्राप्त अर्जावर आवश्यक ती कार्यवाही करुन प्रस्ताव मंजूरीसाठी वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्याबाबतची कार्यवाही करणे.

५. सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयाचे नाहरकतीचे दाखले, नकाशे क्षेत्रीय कार्यालयांचे माध्यमातून संबंधित यंत्रणेस विहित कालावधीत प्रदान करणे.

६. सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयाचे कार्यक्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी मनोरंजनाचे किंवा सार्वजनिक कार्यक्रम व शासकीय कार्यक्रमात जनतेच्या सुरक्षिततेकरीता तसेच अतिमहत्वाच्या (व्ही. व्ही.आय.पी./ व्ही.आय.पी.) व्यक्तिंसाठी वापरावयाचे मंडप, स्टेज, हेलिपॅड इत्यादी बाबतीत सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासणी करुन प्रमाणित करण्यात येते.

७. सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयाचे कार्यक्षेत्रात येणाऱ्या नाट्य व सिनेमागृहांचे योग्यता प्रमाणपत्र जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासणी करुन प्रमाणित करणे.

८. सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयाचे कार्यक्षेत्रात उद्भवणाऱ्या आपत्कालीन घटनांचे अनुषंगाने जनहितार्थ तत्परतेने स्थापत्य अभियांत्रिकाशी संबंधित सुविधा उपलब्ध होण्याकरीता स्थापत्य अभियांत्रिकी कामे करणे व मदत करणे.

९. सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयात व विभागाच्या अधिपत्त्यातील सर्व उपविभागीय कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

१०. सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयाचे अधिपत्त्यातील सर्व उपविभागीय कार्यालयातून कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या जाहिररित्या फलकावर प्रदर्शित करणे.

११. सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयात तसेच अधिपत्त्यातील सर्व उपविभागीय कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी वेळी सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी /तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

१२. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत विहित अर्जान्वये मागविण्यात आलेली माहिती शासकीय गोपनियतेचे उल्लंघन होणार नाही ही बाब पडताळून संबंधितांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे बाबत सक्षम स्तरावर तत्पर कार्यवाही करणे.

१३. सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयाचे कामकाजात पारदर्शकता, सुसूत्रता आणून गतिशील प्रशासकीय कामकाजाचा अवलंब करणे व आधुनिकता आणून सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

१४. सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व विषयांची अनुसूची तयार करणे व निपटारा करणेच्या विहिती कालावधी बाबत अंमलबजावणी करणे.

१५. शासनाच्या नवीन तक्रार पोर्टलवरील तक्रारदाराच्या तक्रारीची तात्काळ दखल घेतली जाते.

१६. सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयात तसेच या कार्यालयाच्या अधिपत्यातील सर्व उपविभागीय कार्यालयात सर्व अभिलेख अद्यावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यावत ठेवणे. नागरीकांच्या प्रश्नांची व खात्याशी संबंधित असलेल्या विषयाची माहिती व केलेली कार्यवाही नागरीकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष उपक्रम राबविणे.

१७. सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयाचे कार्यक्षेत्रात येणाऱ्या ग्रामपंचायत स्तरापासून ते विधान सभेच्या / विधान परिषदेच्या तसेच लोकसभेच्या प्रतिनिधींपर्यत त्यांना आवश्यक असलेली माहिती त्वरीत पूरविणे व जनसंपर्क राखणे.

**१८.** सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयाचे अधिपत्त्यातील सर्व उपविभागीय कार्यालयांतर्गत विविध माहिती त्वरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेत स्थळावर (www.mahapwd.gov.in) अद्यावत करुन उपलब्ध करणे करीता सर्व कार्यालयांना अवगत करणे व संगणकीय नेटवर्कने जोडणे.

**१९.** सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयाचे अधिपत्त्यातील सर्व उपविभागीय कार्यालयामध्ये दैनंदिन कामकाजात आधुनिकता, गतीमानता, व गुणवत्ता आणणे तसेच कार्यालयात सौजन्यपूर्ण सेवाभावी व उत्साही वातावरण ठेवणे व सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयासह सार्वजनिक बांधकाम खात्याची प्रतिमा उज्वल करणे.

**२०.** नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिद्धी देणे.

वरील सर्व कर्तव्ये पार पाडताना सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी, हे कार्यालय ,

**अ**) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

**ब**) सौजन्यपूर्ण व आपुलकीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

**क**) पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे / प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यांत येतील.

# ५. शासकीय विश्रामगृहाचे आरक्षण

दिनांक २८/५/२०१५ च्या शासन निर्णयान्वये विश्रामगृहाचे आरक्षण करण्याकरीता प्राथम्यक्रम निश्चित करण्यात आला असून त्यानुसार उपलब्धतेनुसार विश्रामगृहातील कक्षबंध आरक्षित करण्यात येतात. सदर आरक्षण किमान सात दिवस अगोदर शासनाने विहीत केलेल्या अटी/शर्ती व दरानुसार करण्यात येते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या **https://pwd.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखात्यारीतील विश्रामगृहांचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक इ. माहिती उपलब्ध आहे. तसेच ऑनलाइन पद्धतीने शासकीय विश्रामगृहांचे आरक्षण सुविधा देखील उपलब्ध आहे. **https://resthouse.emahapwd.com**

## विश्रामगृहाचे आरक्षण करण्याकरिता प्राथम्यक्रम

१) महाराष्ट्राचे राज्यपाल

२) राज्याचे मुख्यमंत्री

३) विधानपरिषदेचे सभापती/ विधानसभेचे अध्यक्ष/ उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती

४) लोकआयुक्त

५) मा. मंत्री/ मा. विरोधी पक्षनेते, विधान परिषद व विधान सभा

६) उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती

७) विधान परिषदेचे उप सभापती/ विधान सभेचे उपाध्यक्ष

८) मा. राज्यमंत्री

९) विधान मंडळाच्या समित्यांचे सभासद

१०) लोक प्रतिनिधी (खासदार / आमदार)

११) राज्य शासनाचे शासकीय कामकाजानिमित्त दौ-यावर असणारे अधिकारी / कर्मचारी

१२) केंद्र शासनाचे शासकीय कामकाजानिमित्त दौ-यावर असणारे अधिकारी/ कर्मचारी

१३) राज्य शासनाचे कामावर नसताना येणारे अधिकारी/ कर्मचारी

१४) इतर राज्य शासनाचे शासकीय कामकाजानिमित्त दौ-यावर असणारे अधिकारी/कर्मचारी

१५) माजी खासदार / आमदार / स्वातंत्र्य संग्राम सेनानी / राज्य शासनाचे सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी

१६) अधिस्विकृत पत्रकार/डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र/लोकशाहीर अण्णाभाऊ साठे (राज्य शासन पुरस्कार प्राप्त) व अपंग गुणवंत कामगार (राज्य/केंद्र शासन पुरस्कार प्राप्त)

आदिवासी सेवक पुरस्कार प्राप्त व्यक्ती/ अर्जुन, राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार, ध्यानचंद पुरस्कार, शिवछत्रपती पुरस्कार्थी (फक्त खेडाळू), हिंद केसरी, रुस्तम-ए हिंद भारत केसरी व महान भारत केसरी हे किताब प्राप्त खेळाडू

१७) नाटकात काम करणारे मराठी नाट्यकर्मी

१८) खाजगी व्यक्ती

नाटकात काम करणारे मराठी नाट्यकर्मी यांच्या साठी आरक्षणाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे असतील

१. शासकीय विश्रामगृहातील आरक्षणाचा लाभ फक्त विश्रामगृहाजवळच्या ठिकाणी आयोजित नाटकाच्या प्रयोगामध्ये भाग घेण्यासाठी येणाऱ्या मराठी नाट्यकर्मींना घेता येईल.

२. नाटकाचे प्रयोग नसतील अशा ठिकाणी तसेच नाटकाचे प्रयोग संपल्यानंतरच्या दिवसांसाठी मराठी नाटकर्मी यांना खाजगी व्यक्तीप्रमाणे आरक्षणाचा लाभ घेता येईल.

३. असे आरक्षण जास्तीत जास्त ७ दिवसांसाठी असेल.

४. कक्षांचा ताबा देण्यापूर्वी संपूर्ण कालावधीचे भाडे आगाऊ अनामत घेण्यात येईल.

(सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक आरक्षण-२०१५/प्र.क्र.२६/ मि.व्य-२, दि.२८/५/२०१५, क्र.आरक्षण-२००९/प्र.क्र.८०/ मि.व्य-२, दिनांक १८/१/२०१० व क्र. आरक्षण-२०२१/प्र.क्र.६३/ मि.व्य-२, दिनांक १३/०७/२०२१ नुसार)

# ६ . विभागीय कार्यालयांतर्गत कार्यपूतीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता

## अ) कार्यपुर्तीचे वेळापत्रक -

विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील ठेकेदारांची नोंदणी, विविध प्रकारचे ना हरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी लागणारा कालावधी त्यास सक्षम अधिकारी इत्यादींची माहिती तसेच रस्ते पुल व इमारती आणि इतर कामांविषयींची माहिती, कार्यपूर्तीचे वेळापत्रकात (**परिशिष्ट-ड**) नमूद केली आहे. अर्जाचा विहित नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे यांची माहिती विहित फी भरुन संबंधित विभागीय कार्यालयात मिळू शकेल.

नैसर्गिक आपत्ती कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इ. उद्भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपूर्तीच्या कालावधीत वाढ होवू शकेल.

## ब) माहितीची सुलभता –

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या **https://pwd.maharashtra.gov.in** या वेबसाईटवरुन (संकेतस्थळावरुन) वेळावेळी सादर केल्या जाणाऱ्या विभागीय माहितीचा तपशिल व आकडेवारीचा तपशिल जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

# ७. विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता

सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्यासाठी "रस्ते सुरक्षा समिती" स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यांवरील अपघात प्रवण स्थळे शोधते व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते.

रस्ते सुरक्षा समितीने विभागाअंतर्गत कार्यक्षेत्रातील रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करुन सूचविलेल्या अपघात प्रवण स्थळांची सुधारणा व उपाययोजना टप्प्याटप्प्याने हाती घेण्यात येत आहे. विभागाने रस्ते सुरक्षिततेवर भर देण्यात येत असून तपशिलवार व आवश्यक असे माहिती फलक रस्त्यांवर लावण्यात येत आहेत. जेणेकरुन रस्ते वाहतुकीस पादचाऱ्यांसह सर्वांना सर्वकाळ सुरक्षित ठेवण्याचा मानस आहे.

# ८ . नागरिकांच्या सनदेचा तसेच जनसमान्यांकडून प्राप्त सूचनांचा आढावा / सिंहावलोकन

**अ) गाऱ्हाणी/ तक्रारी यांचे निराकरण -**

नागरीकांच्या गाऱ्हाण्यांचे निराकरण विहित कालावधीत करणे हे विभागाचे प्रमुख उद्दीष्ट राहील. कार्यपूतीस होणारा विलंब व अन्य काही गा-हाणी विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील कार्यालयाबाबत विभागांतर्गत काही कामाबाबत असतील तर, त्यासाठी नागरीकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे / तक्रार असेल तर ज्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखांकडे तक्रार नोंदवावी. या विभागाकडे ऑनलाइन RTI अर्ज, आपले सरकार पोर्टल, PG पोर्टल द्वारे नागरिक तक्रारी नोंदवू शकतात. अशा गाऱ्हाणी / तक्रारीचे निराकरण या कार्यालयाकडून नियमानुसार विहित कालावधीत करण्यांत येईल.

गाऱ्हाणी समक्ष भेटीत / पत्राने वा "ई" मेल द्वारेही नागरीक मांडू शकतात.

**ब) नागरीकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन**

सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयाच्या या नागरीकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा घेण्यात येईल व त्याचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात येईल.

**क) जनसामान्यांकडून सुचना -**

सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी या कार्यालयाची ही नागरीकांची सनद सर्वसामान्य नागरीकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरीकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरीकांची सनद स्वतःहून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरीकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

# ९ . नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी

सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी हे कार्यालय नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देवून नागरीकांच्या प्रतिक्रिया / अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.

सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. विभागाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरीकांना संवेदनशील सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. ग्राहक केंद्रीत सेवेची उद्दीष्टे प्राधान्याने अंगीकारुन ग्राहकांना त्वरीत प्रतिसाद दिला जाईल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरीकांचा सल्ला घेतला जाईल.

प्रशिक्षित व प्रोत्साहित कर्मचारी वर्गाद्वारे नविन तंत्र वापरुन ग्राहकांना सेवा पुरविली जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरीकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल व तक्रारशुन्य सेवा असल्याची खात्री करण्यात येईल.

# १०. नागरीकांची जबाबदारी

**१)** शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरीकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.

**२)** नागरीकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.

**३)** नागरीकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा आसावा.

**४)** विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.

**५)** सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था राखण्यास सहकार्य करावे.

**६)** नागरीकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.


**७)** रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या वृक्षराजीचे जतन ही नागरीकांची सुध्दा जबाबदारी राहील.

**८)** नागरीकांनी कायदेशीर तरतुदी, नियम अलिखित संकेत यांचे पालन करावे.

**९)** नागरीकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

# परिशिष्ट - अ

## मुख्यालय दर्शविणारा वृक्षतक्ता



# परिशिष्ट ब

## कार्यक्षेत्र दर्शविणारा वृक्षतक्ता

**कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
सावंतवाडी

- उपकार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, सावंतवाडी
- सा. बां. उपविभाग क्र. १, सावंतवाडी
- सा. बां. उपविभाग, कुडाळ
- सा. बां. उपविभाग, वेंगुर्ले
- सा. बां. उपविभाग, मालवण
- सा. बां. उपविभाग, दोडामार्ग



## परिशिष्ट ब- २

# सार्वजनिक बांधकाम विभाग सावंतवाडी

**महेंद्र किणी**
**कार्यकारी अभियंता**

- **सीमा गोवेकर** — उपकार्यकारी अभियंता
  - रुपेश पवार — प्रकल्प अवेक्षक
  - अमेय रंगदळ — प्रकल्प अवेक्षक
  - निशिगंधा माने — प्रकल्प अवेक्षक
- **वैभव सगरे** — उपविभागीय अभियंता, सा. बां. उपविभाग क्र. १,सावंतवाडी
  - प्रमोद लोहार — सहाय्यक अभियंता श्रेणी - 2
  - निलम पावरा — सहाय्यक अभियंता श्रेणी - 2
  - विजय चव्हाण — शाखा अभियंता
  - विनय रंगसूर — शाखा अभियंता
  - प्रमोद मोडक — कनिष्ठ अभियंता
- **धीरजकुमार पिसाळ** — सहाय्यक कार्यकारी अभियंता, सा.बां. उपविभाग क्र. १ कुडाळ
  - प्रदिप पाटील — शाखा अभियता
  - ईश्वर बामणे — कनिष्ठ अभियता
  - जगन्नाथ माहिते — कनिष्ठ अभियता
  - प्रशांत पाटोळे — कनिष्ठ अभियंता
  - महेश पवार — कनिष्ठ अभियंता
- **अश्लेष शिंदे** — सहाय्यक कार्यकारी अभियंता, सा.बां. उपविभाग वेंगुर्ला
  - राहुल आडोळे — कनिष्ठ अभियंता
  - ओंकार पोवार — कनिष्ठ अभियंता
  - दिव्या जांभळे — कनिष्ठ अभियंता
  - मनोज सोनार — कनिष्ठ अभियता
- **अनिल बडे** — उपविभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग दोडामार्ग
  - शुभम बागल — सहाय्यक अभियंता श्रेणी -2
  - संभाजी घंटे — कनिष्ठ अभियंता
  - अंकिता कांबळे — कनिष्ठ अभियंता
  - प्रविण गावडे — कनिष्ठ अभियंता
- **अजित पाटील** — सहाय्यक अभियंता श्रेणी -1, सा.बां. उपविभाग मालवण
  - स्नेहा लोंखडे — कनिष्ठ अभियंता
  - पुरुषोत्तम भोये — कनिष्ठ अभियंता
  - सुरज गिरी — कनिष्ठ अभियता

# परिशिष्ट – क

## १. कार्यक्षेत्रातील रस्त्यांचा दर्जा व उपविभाग निहाय रस्त्यांची लांबी

**मार्च २०२५ अखेर** **सा.बां. विभाग, सावंतवाडी.**

| उपविभाग | रस्त्यांचा प्रकार | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रमुख राज्यमार्ग | राज्यमार्ग | प्रमुख जिल्हा मार्ग | रस्त्यांची एकूण लांबी (कि.मी.) |
| सावंतवाडी | १६.५० | १०९.४३ | १६७.३५ | २९३.२८ |
| कुडाळ | - | ५९.२५ | ९५.८१ | १५५.०६ |
| वेंगुर्ले | ५१.२० | ३६.१५ | ९१.३३ | १७८.६८ |
| मालवण | २३.३० | ३४.५५ | १७२.४७ | २३०.३२ |
| दोडामार्ग | - | ८०.६१५ | ६७.२६ | १४७.८७५ |
| **एकूण लांबी** | **९१.००** | **३१९.९९५** | **५९४.२२** | **१००५.२२** |

## २. विभागाच्या कार्यक्षेत्रातील उपविभाग निहाय पूलांची सूची

| उपविभाग | पूलांचा प्रकार | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २०० मी. वरील लांबी | ६० ते २०० मी. लांबी | ३० ते ६० मी. लांबी | ६ ते ६० मी. लांबी | मोऱ्या |
| सावंतवाडी | २ | ३ | १० | २२ | ६२९ |
| कुडाळ | - | १ | ३ | २१ | ५१३ |
| वेंगुर्ले | - | १ | २ | ३१ | ५३२ |
| मालवण | ३ | २ | ६ | ३५ | ६९४ |
| दोडामार्ग | - | ५ | ४ | १६ | ३६१ |
| **एकूण** | **५** | **१२** | **२५** | **१२५** | **२७२९** |
| | **एकूण = १६७** | | | | |

## ३ . विभागाच्या कार्यक्षेत्रातील उपविभाग निहाय शासकीय इमारतींची सूची

| अ. क्र. | उपविभागाचे नाव | अनिवासी इमारती संख्या | निवासी इमारती संख्या | एकूण इमारत संख्या | अनिवासी इमारतीचे क्षेत्रफळ (चौ. मी.) | निवासी इमारतीचे क्षेत्रफळ (चौ. मी.) | एकूण क्षेत्रफळ निवासी /अनिवासी इमारती (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१, सावंतवाडी | ७९ | ५५ | **१३४** | १९३५६.९८ | १२०३७.४९ | **३१३९४.४७** |
| २ | सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१, कुडाळ | ६९ | २० | **८९** | १४०४५.९९ | ४२३९.४४ | **१८२८५.४३** |
| ३ | सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वेंगुर्ला | ४८ | १८ | **६६** | १६३८५.८८ | ६०६९.६७ | **२२४५५.५५** |
| ४ | सार्वजनिक बांधकाम उपविभाग, दोडामार्ग | १० | ७ | **१७** | ५१५१.०८ | ९४१.८७ | **६०९२.९५** |
| ५ | सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालवण | ५७ | २३ | **८०** | २४५९१.७० | ११४०२.२८ | **३५९९३.९८** |
| | **एकूण** | **२६३** | **१२३** | **३८६** | **७९५३१.६३** | **३४६९०.७५** | ११४२२२.३८ |

# परिशिष्ट ड

# कार्यपूर्तीचे वेळापत्रक

| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे सक्षम अधिकारी | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा विहित मुदतीत न विहित मुदत पुरविल्यास तक्रार |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ठेकेदारांनी अवलंबावयाची ई-निविदा कार्यप्रणाली | | | | |
| अ | कंत्राटदार वर्ग ४ व ४ (अ) नोंदणी नुतनीकरण | मुख्य अभियंता क्षेत्रिय कार्यालय | ९० दिवस | सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई |
| ब | कंत्राटदार वर्ग ५, ५(अ), ६ आणि बेरोजगार अभियंताचे नोंदणीकरण व मंजूर सहकारी संस्था वर्ग अ यांचे वर्गीकरण व नुतनीकरण | अधीक्षक अभियंता | ३० दिवस | मुख्य अभियंता, संबंधित प्रादेशिक विभाग |
| क | कंत्राटदार वर्ग ७,८,९ आणि मजूर कामगार सहकारी संस्था वर्ग ब यांचे वर्गीकरण, इमारत देखभाल व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे वर्ग ७ मध्ये नोंदणीकरण व नुतनीकरण | कार्यकारी अभियंता | ३० दिवस | अधीक्षक अभियंता, संबंधित |
| २ | रस्त्याच्या कडेला असलेल्या, इमारतीचा ना हरकत परवाना | कार्यकारी अभियंता | ३० दिवस | अधीक्षक अभियंता संबंधित मंडळ |
| ३ | पेट्रोल पंप आणि पेट्रोल पंपाच्या पोहोच मार्गाचे शासन स्तरावर परीपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते. | कार्यकारी अभियंता | ६० दिवस | उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई |
| ४ | रस्ता ओलांडून जाणा-या वाहिन्यांसाठी ना हरकत प्रमाणपत्र | १. मुरुड / माती/खडीचा रस्ता - उप अभियंता२. डांबरी रस्ता/ पदपथकार्यकारी अभियंता ३. काँक्रीट रस्ता व पदपथ- अधीक्षक अभियंता | ३० दिवस | १. मुरुड / माती/खडीचा रस्ता कार्यकारी अभियंता२. डांबरी रस्ता/ पदपथ अधीक्षक अभियंता ३. काँक्रीट रस्ता व पदपथ- मुख्य अभियंता |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ५ | विश्रामगृहांचे आरक्षणपत्र | कार्यकारी अभियंता | ७ दिवस | अधीक्षक अभियंता, संबंधित मंडळ |
| ६ | सरकारी इमारतीचे "ना उपलब्धता " प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस | अधीक्षक अभियंता, संबंधित मंडळ |
| ७ | रास्त भाडे / प्रमाणभाडे प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस | अधीक्षक अभियंता, संबंधित मंडळ |
| ८ | इमारतीचे मूल्यनिश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | ३० दिवस | अधीक्षक अभियंता, संबंधित मंडळ |
| ९ | पथ किनारावर्ती नियमांच्या अनुषंगाने परवानगी देणे | कार्यकारी अभियंता | ३० दिवस | अधीक्षक अभियंता, |
| १० | राष्ट्रीय महामार्गाच्या कडेला प्रस्तावित असलेल्या इमारतीस मुख्य अभियंता बांधकामाचा जोडरस्ता वगळून ना हरकत परवाना | कार्यकारी अभियंता | ३० दिवस | मुख्य अभियंता, |
| ११ | राष्ट्रीय महामार्ग लगतच्या पेट्रोल पंप आणि खाजगी मालमत्ता यांचे [illegible] मार्गाचे ना हरकत | कार्यकारी अभियंता | ३० दिवस | मुख्य अभियंता |
| १२ | राष्ट्रीय महामार्ग ओलांडून बाजूने / भूमिगत वाहिन्यांसाठी ना-हरकत प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | ३० दिवस | उप सचिव, (रा.म.)सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| १३ | राष्ट्रीय महामार्ग लगत व छेदून केबल वाहिन्या टाकण्याचे प्रस्ताव | कार्यकारी अभियंता | ३० दिवस | उप सचिव, (रा.म.)सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| १४ | राष्ट्रीय महामार्गावरुन ओव्हरहेड वाहिन्या टाकण्याचे प्रस्ताव | कार्यकारी अभियंता | ३० दिवस | उप सचिव, (रा.म.) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| १५ | राष्ट्रीय महामार्ग बाजूने / छेदून कालवा २.५ मिटर क्रॉसिंगचे रस्त्यालगत दूरध्वनी केबल प्रस्ताव | कार्यकारी अभियंता | ४५ दिवस | उप सचिव, रा.म. सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई. |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| १६ | रस्त्यालगत दूरध्वनी केबल टाकण्याकरीता परवानगी मिळणेबाबत | १. प्रमुख राज्यमार्ग / राज्यमार्ग / प्रमुख जिल्हा मार्ग - कार्यकारी अभियंता<br>२. राष्ट्रीय महामार्गाकरीता - संबंधित राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यकारी अभियंता<br>३. इतर जिल्हा मार्ग/ ग्रामीण मार्ग/गाव रस्तेसंबंधित कार्यकारी अभियंता | ६० दिवस | उप सचिव, (रा.म.)/ उप सचिव रस्ते, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| १७ | रस्त्यालगत पाणी / गॅस / तरल द्रव्य पाईप लाईन टाकण्याकरीता परवानगी मिळणेबाबत | कार्यकारी अभियंता | ४५ दिवस | उप सचिव, (रा.म.)/ रस्ते इमारती , सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| १८ | शोभिवंत व फुलझाडांच्या रोपांचा पुरवठा करणे | संबंधित सहाय्यक संचालक उपवने व उद्याने | ३० दिवस | संचालक उपवने व उद्याने |
| १९ | शासकीय जमिनीवरील पुतळे व अर्धपुतळे याबाबतचे प्रस्ताव | मुख्य वास्तुशास्त्रज्ञ | ४५ दिवस | उप सचिव, इमारती , सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| २० | सरकारी निवासस्थान न मिळण्याचे प्रमाणपत्र (अनुपलब्धता) | कार्यकारी अभियंता | ७ दिवस | अधीक्षक अभियंता, संबंधित मंडळ |
| २१ | सरकारी निवासस्थान मिळण्याबाबतचे प्रतिक्षा यादी | कार्यकारी अभियंता | ७ दिवस | अधीक्षक अभियंता, संबंधित मंडळ |
| २२ | सरकारी निवासस्थानी राहणाऱ्या निवृत कर्मचाऱ्यांच्या बाबतचे ना हरकत दाखले | कार्यकारी अभियंता | ३० दिवस | अधीक्षक अभियंता, संबंधित मंडळ |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| २३ | पथकर नाक्यावर पथकर दर व माहिती दर्शक फलक लावणे | कार्यकारी अभियंता | प्रकल्प पूर्ण झाल्यावर | अधीक्षक अभियंता, संबंधित मंडळ |
| २४ | कार, जीप ला पथकरातून सूट दिल्याने उद्योजकास द्यावयाचा | कार्यकारी अभियंता | ३ महिन्याचे आत | अवर सचिव |
| २५ | अपघात स्थळ घोषित झाल्यानंतर-१) तात्पुरत्या सुधारणा२)कायमस्वरुपी सुधारणा | कार्यकारी अभियंता | १) ३ महिने २) १ वर्ष | मुख्य अभियंता |
| २६ | नागरिकांनी दिलेल्या तक्रारी यथोचित उत्तर देणे | सह सचिव (सं.नि.) | ४५ दिवस | सचिव (रस्ते)/सचिव (बांधकामे) |
| २७ | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निरनिराळया रस्ते व इमारती विषयक योजनांचा तपशील देणे १) BEAMS प्रणाली. | अधीक्षक अभियंता | दर ३ महिन्यांनी | मुख्य अभियंता |
| २८ | रस्ते विकास योजनांचा आढावा | उप सचिव (रस्ते) | ३ वर्ष | सचिव (रस्ते) |
| २९ | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रकल्पांतर्गत भूसंपादनाचा ॲवार्ड घोषित झाल्यावर मोबदला देणे | उप सचिव (रस्ते) उप सचिव (इमारती) उप सचिव (खा.र.-१) उप सचिव (खा.र.-२) | २४ महिने | सचिव (रस्ते) |

**टिप** - सर्व वर्गाच्या नोंदणी व नुतनीकरण करणेसाठी अर्ज कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात स्विकारण्यांत येतात.

# परिशिष्ट – इ
# लोकसेवा हक्क अधिनियम , २०१५

| अ. क्र. | लोकसेवचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | अर्जाचा विहित नमुना विहित शुल्क | सेवा पुरविणारे पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील प्राधिकारी | व्दितीय अपील प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | **रस्ता ओलांडून-समांतर जाणाऱ्या वाहिन्यांसाठी (ऑप्टीकल फायबर केबल, गॅस, पाणी पाईपलाईन ई.)ना-हरकत प्रमाणपत्र देणे.** | अर्जदाराकडून Online द्वारे अर्ज प्राप्त झाल्यानंतर तसेच आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर 30 दिवस. | अर्जाचा नमुना मैत्री पोर्टलवर व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावर www.pwd.maharashtra. gov.in वर उपलब्ध आहे (सेवाशुल्क सा. बां.वि. च्या नियमाप्रमाणे ) (e-permission link) | **कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग** | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| 2. | **उद्योग घटकांसाठी मूलभूत सुविधा जसे वीज, पाणी सांडपाणी इ. जोडणी पुरवण्यासाठी रस्ता खोदणे, मुख्य रस्त्यांना जोड रस्ते इ. करिता ना-हरकत प्रमाणपत्र देणे.** | अर्जदाराकडून Online द्वारे अर्ज प्राप्त झाल्यानंतर तसेच आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर 30 दिवस. | अर्जाचा नमुना मैत्री पोर्टलवर व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावर www.pwd.maharashtra. gov.in वर उपलब्ध आहे (सेवाशुल्क सा. बां.वि. च्या नियमाप्रमाणे ) (e-permission link) | **कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग** | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| 3. | पेट्रोलपंपाच्या पोहोच मार्गाचे ना- हरकत प्रमाणपत्र देणे. | अर्जदाराकडून Online द्वारे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ४५ दिवस | अर्जाचा नमुना मैत्री पोर्टलवर व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावर www.pwd.maharashtra. gov.in वर उपलब्ध आहे (सेवाशुल्क सा. बां.वि. च्या नियमाप्रमाणे (e-permission link ) | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग. | सचिव (रस्ते). |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतीना ना-हरकत प्रमाणपत्र देणे.** | अर्जदाराकडून Online द्वारे अर्ज प्राप्त झाल्यानंतर तसेच आर्श्यक त्या कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर ४५ दिवस. | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावर www.pwd. maharashtra.gov. in वर उपलब्ध आहे (सेवाशुल्क सा.बां. वि. च्या नियमाप्रमाणे ) (e-permission link) | **कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग** | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| ५ | **सा.बां. विभागा्रतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खडडे भरणे.** | अर्जदाराकडून Online द्वारे अर्ज प्राप्त झाल्यानंतर १५ दिवस. | PCRS App Google Play Store वर उपलब्ध आहे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावर www.pwd. maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. | **कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग** | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| ६ | कंत्राटदार वर्ग ४ व ४ (अ) नोंदणी नुतनीकरण | अर्जदाराकडून Online द्वारे अर्ज प्राप्त झाल्यानंतर तसेच आर्श्यक त्या कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर ६० दिवस. | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावर www.pwd. maharashtra.gov. in वर उपलब्ध आहे (सेवाशुल्क सा.बां. वि. च्या नियमाप्रमाणे ) (e-permission link) | मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | उप सचिव (इमा) सार्वजनिक बांधकाम विभाग | सचिव (बांधकामे). |
| ७ | कंत्राटदार वर्ग ५, ५(अ), ६ आणि बेरोजगार अभियंताचे नोंदणीकरण व मंजूर सहकारी संस्था वर्ग अ यांचे वर्गीकरण व नुतनीकरण | अर्जदाराकडून Online द्वारे अर्ज प्राप्त झाल्यानंतर तसेच आर्श्यक त्या कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर ६० दिवस. | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावर www.pwd. maharashtra.gov. in वर उपलब्ध आहे (सेवाशुल्क सा.बां. वि. च्या नियमाप्रमाणे ) (e-ROC link) | मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | उप सचिव (इमा) सार्वजनिक बांधकाम विभाग | सचिव (बांधकामे). |
| ८ | **कंत्राटदार वर्ग ७,८,९ आणि मजूर कामगार सहकारी संस्था वर्ग ब यांचे वर्गीकरण, इमारत देखभाल व स्थापत्य अभियांत्रिकीसहाय्यकाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे वर्ग ७ मध्ये नोंदणीकरण व नुतनीकरण** | अर्जदाराकडून Online द्वारे अर्ज प्राप्त झाल्यानंतर तसेच आर्श्यक त्या कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर ६० दिवस. | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावर www.pwd. maharashtra.gov. in वर उपलब्ध आहे (सेवाशुल्क सा.बां. वि. च्या नियमाप्रमाणे ) ([illegible] Link) | **कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग** | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग. |

# धन्यवाद

